॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

✲ सुविचार ✲

विचार सकारात्मक असतील तर परिणामही सकारात्मकच असतो.

अहिल्यानगर ▪ सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ ▪ वर्ष ७ वे ▪ अंक ८९ वा ▪ पाने ४ ▪ किंमत ३ रुपये ▪ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com

## फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### कुस्ती

आरोप चौकशी जरासा
आता थांबवा खेळ
खालावले राजकारण
जरा घालावा मेळ

समोर असतात भांडण
आतून असते दोस्ती
स्वतःला वेगळे म्हणवणारे
सल्ल्यात खेळतात कुस्ती!

# निवडणूक आयोगाने कामकाजाचे नियम बदलले

## महाराष्ट्रात मतदार पडताळणीबाबत बीएलओ थेट घरी येऊन कागदपत्रे जमा करणार । निवडणूक आयोगाचा निर्णय




**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

निवडणूक आयोगाने शनिवारी बैठकीनंतर आपल्या कामकाजाशी संबंधित अनेक नियमांमध्ये बदल केले आहेत. आयोगाच्या बैठकीत ९ निर्णय घेण्यात आले. यामध्ये मतदारांच्या सुनावणीशी, आयटी प्रणालीशी, अधिकाऱ्यांच्या परदेश दौऱ्यांशी आणि आयोगाच्या बैठकीच्या प्रक्रियेशी संबंधित बदलांचा समावेश आहे.

अंतर्गत मतभेदांच्या दाव्यांदरम्यान आयोगाच्या बैठकीला मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, दोन्ही निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी उपस्थित होते. आयोगाने स्पष्ट केले की मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरावलोकनाशी (एसआयआर) संबंधित निर्णय सर्वसंमतीने घेण्यात आले होते. गेल्या १० महिन्यांत दोन निवडणूक आयुक्तांनी निवडणूक आयोगाच्या निर्णयांवर १४ वेळा आक्षेप घेतले; मात्र त्यांची कोणतीही दखल घेण्यात आली नाही. अशा वेळी आयोगाचे हे विधान समोर आले आहे. आयोगाने शनिवारी प्रसिद्धीपत्रक जारी करून सांगितले की, संधू आणि जोशी यांनी मंत्रिमंडळ सचिवांना पाठवलेली पत्रे प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिकाऱ्याशी संबंधित होती. संधू आणि जोशी यांनी त्या आदेशावर आक्षेप घेतला होता, ज्यामुळे मतदार यादीत नावे जोडणे, वगळणे आणि नोंदी अद्ययावत करण्याचे अधिकार केंद्रीय पातळीवर केंद्रीभूत होण्याची शक्यता होती.

आयोगाने सांगितले की संबंधित अधिकाऱ्याच्या वतीने जारी केलेले कामाच्या पुनर्वितरणाचे आदेश कधीच लागू झाले नाहीत. आयोगाने स्पष्ट केले की निवडणूक आयुक्तांकडून अधिकाऱ्यांना दिलेल्या सर्व सूचनांचे काळजीपूर्वक पालन केले जाईल. ईसीआयनेटच्या तपासणीसाठी एका वरिष्ठ उपनिवडणूक आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली जाईल, ज्यामध्ये आयआयटी/आयआयआयटीमधील एक स्वतंत्र तज्ज्ञ असेल.

आयोगाच्या म्हणण्यानुसार, रकफ मध्ये ज्या लोकांची नावे राहून गेली आहेत, ते मतदार यादी अद्ययावत करण्याच्या सुरू असलेल्या प्रक्रियेंतर्गत संबंधित बीएलओ कडे नाव समाविष्ट करण्यासाठी अर्ज करू शकतात. यामध्ये तरुण आणि पहिल्यांदा मतदान करणा–या लोकांचाही समावेश आहे. आयोगाने सीईओ, डीईओ आणि ईआरओ यांना अशा लोकांची नावे जोडण्यासाठी विशेष मोहीम राबवण्याचे निर्देश दिले आहेत. एसआयआर दरम्यान आतापर्यंत ३० राज्ये/केंद्रशासित प्रदेशांच्या प्रारूप मतदार यादीतून १३.३७ कोटी नावे कमी झाली आहेत. निवडणूक आयोगाच्या म्हणण्यानुसार, देशात एकूण ९६.८८ कोटींहून अधिक मतदार आहेत, म्हणजेच एसआयआरमध्ये सुमारे १४.१% मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत.

नवीन निर्णयांनंतरही ऑनलाइन फॉर्म–६ मध्ये पालकांशी संबंधित प्रश्न का जोडण्यात आला, हे स्पष्ट करण्यात आलेले नाही. तो प्रश्न कोणी जोडला आणि आता तो हटवण्यात आला आहे का, हेही सांगण्यात आलेले नाही. पश्चिम बंगालमध्ये मतदार यादीशी संबंधित सुमारे १६ लाख नावांविरोधात अपील कोणाच्या आदेशावर दाखल करण्यात आली, या प्रश्नाचेही स्पष्ट उत्तर देण्यात आलेले नाही. याशिवाय, गोव्यात मतदाराचे नाव पुन्हा बहाल करणारे सॉफ्टवेअर फीचर का सुरू झाले नाही आणि आयटी विभागातील काही अधिकाऱ्यांबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांवर काय कारवाई करण्यात आली, याची माहितीही नव्या निर्णयांमध्ये नाही.

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

महाराष्ट्रात सध्या सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण म्हणजेच डखठ मोहिमेबाबत केंद्रीय निवडणूक आयोगाने मतदारांना मोठा दिलासा देणारा अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. ज्या मतदारांच्या माहितीमध्ये तार्किक विसंगती आढळली आहे किंवा ज्यांचे नाव जुन्या नोंदींशी जुळलेले नाही अशा नागरिकांना नोटीस बजावण्यात आली होती. आता अशा कोणत्याही मतदाराला निवडणूक कार्यालयात प्रत्यक्ष चकरा मारण्याची गरज उरलेली नाही, कारण बूथ लेव्हल ऑफिसर म्हणजेच बीएलओ स्वतः मतदारांच्या घरी जाऊन आवश्यक ती सर्व कागदपत्रे गोळा करणार आहेत.

निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे की, नोटीस मिळालेल्या नागरिकांना कागदपत्रे जमा करण्यासाठी किंवा माहितीची पडताळणी करण्यासाठी सरकारी कार्यालयांमध्ये रांगेत उभे राहावे लागणार नाही. बीएलओ स्वतः घरोघरी भेट देऊन संबंधित कागदपत्रे स्वीकारतील आणि ती डिजिटल प्रणालीवर अपलोड करतील. सामान्य परिस्थितीत कोणत्याही मतदाराला निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांसमोर प्रत्यक्ष सुनावणीसाठी बोलावले जाणार नाही. केवळ अपवादात्मक स्थितीतच सुनावणी घेतली जाईल आणि तीसुद्धा ऑनलाईन पद्धतीने पार पडेल. जर ऑनलाईन सुनावणीदरम्यान मतदार स्वतः उपस्थित राहू शकत नसेल, तर त्याच्या वतीने कुटुंबातील कोणताही प्रौढ सदस्य सुनावणीत भाग घेऊ शकेल.

या मोहिमेअंतर्गत काम करताना नागरिकांना पुरेसा वेळ मिळावा यासाठी निवडणूक आयोगाने महत्त्वाच्या तारखांमध्ये वाढ केली आहे.

**नवीन अर्ज करण्याची अंतिम तारीख : १२ ऑक्टोबर २०२६**

**नोटिसांचा निपटारा करण्याची मुदत : १० नोव्हेंबर २०२६**

**अंतिम मतदार यादी प्रसिद्धी : १६ नोव्हेंबर २०२६**

मुदतवाढीच्या या निर्णयामुळे कागदपत्रे वेळेत सादर करणे मतदारांसाठी अधिक सोपे झाले आहे.

सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांचा मतदार यादीत समावेश व्हावा यासाठी आयोगाने जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना विशेष सूचना दिल्या आहेत. बेघर नागरिक, दररोज मजुरी करणारे कामगार आणि रैन बसेरांमध्ये राहणाऱ्या लोकांसाठी ठिकठिकाणी विशेष मदत कक्ष आणि शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश मतदार यादी पूर्णपणे अचूक करणे आणि एकही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहणार नाही याची खात्री करणे हा आहे.

## SPOT NEWS

### केदारनाथ यात्रा मार्गावर भूस्खलन; दरड कोसळली

**● रुद्रप्रयाग –** उत्तराखंडमधील रुद्रप्रयाग येथे केदारनाथ यात्रेच्या मार्गावर दरड कोसळल्याने सुमारे ४,००० भाविक अडकले आहेत. डोंगरावरून सतत कोसळणाऱ्या दरडींमुळे रस्ता मोकळा करण्याच्या कामात अडथळे येत आहेत. खराब हवामानामुळे केदारनाथ यात्रा आजच्या दिवसासाठी स्थगित करण्यात आली असून हेलिकॉप्टर सेवाही बंद ठेवण्यात आली आहे. दरम्यान, डेहराडून, टिहरी, हरिद्वार आणि पौरीसाठी रेड अलर्ट; उत्तरकाशी, चमोली, नैनिताल आणि रुद्रप्रयागसाठी ऑरेंज अलर्ट; तसेच बागेश्वर, अल्मोडा, चंपावत, उधम सिंग नगर आणि पिथोरागढसाठी येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. उत्तर प्रदेशातील लखनौ, कानपूर, उन्नाव, बाराबंकी, अयोध्या आणि जौनपूरसह ४५ शहरांमध्ये गेल्या ६५ तासांपासून मुसळधार पाऊस पडत आहे. ताशी ३० ते ४० किमी वेगाने वारे वाहत आहेत. २२ जिल्ह्यांमध्ये अचानक पूर येण्याचा धोका निर्माण झाला आहे. गेल्या दोन दिवसांत वादळ आणि पावसामुळे ५७ जणांचा मृत्यू झाला आहे. शेतकऱ्यांची शेकडो बिघे पिके नष्ट झाली असून हजारो झाडे आणि विजेचे खांब उन्मळून पडले आहेत. बिहारमध्ये अर्नब चक्रीवादळाचा प्रभाव आता ओसरला असला, तरी राज्यात गेल्या ७२ तासांपासून सतत पाऊस पडत आहे. नेपाळच्या तराई भागात झालेल्या मुसळधार पावसामुळे गंडक आणि कोसी नद्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे.

### दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबातील लग्नात शिवसेना करणार खर्च

**● मुंबई –** दुष्काळग्रस्त भागासाठी सरकारने उपाययोजना घोषित करण्यास प्रारंभ केला असतानाच शनिवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सरकारी तिजोरीवर पहिला हक्क सरकारचा असल्याचे जाहीर केले. ज्या शेतकरी कुटुंबात मुला–मुलींचे लग्न ठरलेली आहेत, त्यांच्या विवाहखर्चाला शिवसेना हातभार लावेल, अशी घोषणाही त्यांनी केली आहे. दुष्काळी जिल्ह्यातील ज्या शेतकऱ्यांच्या मुला–मुलींची लग्न ठरली आहेत. त्यांनी शिवसेनेचे स्थानिक लोकप्रतिनिधी आणि पदाधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. त्यांना आवश्यक ती मदत शिवसेनेच्या माध्यमातून केली जाईल, असे शिंदे यांनी जाहीर केले आहे.

## माफ करा, अंदाज चुकला, दुष्काळ पडणार : पंजाबराव डख

**● परभणी । वीरभूमी–**

राज्यातल्या शेतक–यांनी ज्यांच्यावर हवामान तज्ज्ञ म्हणून भरोसा टाकला. त्यांनीच आता राज्यात दुष्काळ पडणार असल्याचे मान्य केले आहे. मराठवाड्यातल्या परभणी जिल्ह्यातील हवामानाचा अचूक अंदाज वर्तवण्यात प्रसिद्ध असणारे पंजाबराव डखांनी सोशल मीडियावरुन एका पोस्टच्या माध्यमातून यंदा राज्यात दुष्काळ पडणार असल्याचे सांगितले आहे. एवढच नाही तर त्यांनी आपण २०२६ मध्ये सांगितलेले सगळे अंदाज चुकल्याबद्दल माफीही मागितली आहे. माफ करा २०२६ मध्ये अंदाज चुकला, राज्यात दुष्काळ पडणार असे थेट म्हणाले आहेत. त्यामुळे शेतकरीवर्गालाही धक्का बसला आहे. यावरुन शेतकऱ्यांनीही त्यांना सोशल मीडियावर घेरले आहे.

दरम्यान, महाराष्ट्र सरकारने ७५ टक्के राज्यात दुष्काळ जाहीर केला आहे. त्यासाठी मोठी मदतप्रणाली कामाला लागली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून राज्यातून पावसाने दडी मारली होती. शेतकऱ्यांनी पिक पेरणी करुन ठेवली होती. पाण्याअभावी पिके करपून जात होती. त्या पार्श्वभूमिवर राज्य सरकारने दुष्काळ जाहीर केला आहे. दरम्यान, राज्यात पावसाळा सुरु झाल्यापासून शेतकऱ्यांसह इतरही नागरिक हवामान विभागाच्या आणि इतरही हवामान तज्ज्ञांच्या अंदाजांवर लक्ष ठेवून असतात. त्यांच्या भरवशावर राहून आपले शेतीचे नियोजन करण्यात येते. कधकधी तर स्वत: राज्य सरकारही याबाबत आवाहन करताना दिसून येते. पण यंदा शेतकरी राजावर खूपच वाईट वेळ येऊन ठेपलेली पाहायला मिळाली. मुख्यमंत्री राज्यात दौरा करताना दिसून आले होते. त्यावेळी शेतकऱ्यांना त्यांची अवस्था सांगताना अश्रू अनावर झालेले पाहायला मिळाले होते.

## उग्र वासामुळे दोन तरुणांचा मृत्यू; मुंबईतील धक्कादायक घटना

**● मुंबई । वीरभूमी–**

गोरेगाव पूर्व भागातील राम मंदिर परिसरातील एका सार्वजनिक शौचालयात एक धक्कादायक घटना घडली आहे. ज्यामुळे दोघांना स्वत:चे प्राण गमवावे लागले आहेत. समोर आलेल्या माहितीनुसार, शौचालयातील केमिकलच्या उग्र वासामुळे दोन तरुणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही भयानक घटना पारसी पंचायत गेटसमोर, मृणालताई ब्रिजजवळ घडली आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, २७ सप्टेंबर रोजी सकाळी साडेआठ वाजता सार्वजनिक शौचालयात केमिकलच्या वासाने दोघांना श्वास गुदमरल्याची माहिती मिळाली होती. घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिस तात्काळ घटनास्थळी पोहोचले. दोघांना तात्काळ बेशुद्ध अवस्थेत ट्रामा केअर रुग्णालयात दाखल करण्यात आले.

शौचालयात येत असलेल्या उग्र वासामुळे ज्या दोघांनी आपले प्राण गमावले त्यांची नावे देखील समोर आली आहे. मृतांची ओळख प्रभाकर धनिवार (२४ वर्षे)आणि भावीन देसाई (१८ वर्षे) अशी झाली आहे. प्राथमिक तपासानंतर दम लागून मृत्यू झाल्याची प्राथमिक शक्यता वर्तवली जात आहे.

समोर येत असलेल्या माहितीनुसार, या शौचालयाच्या बाजूला घरगुती छोटा कारखाना आहे, त्यामध्ये काही केमिकल वापरले जात होते. मिळालेल्या माहितीनुसार कारखान्यातील लोक केमिकल ड्रेनेजमध्ये टाकतात आणि ड्रेनेज लाईन व संडासची लाईन बाजू–बाजूला आहे, हे केमिकल घातक आहे.

## आजपासून सुरू होणारा ३ दिवसांचा देशव्यापी बँक संप अखेर मागे

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

देशातील बँक कर्मचाऱ्यांनी २८ ते ३० सप्टेंबर दरम्यान पुकारलेला तीन दिवसांचा देशव्यापी संप अखेर मागे घेण्यात आल्याने सर्वसामान्य नागरिक आणि व्यापाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्स आणि इंडियन बँक्स असोसिएशन यांच्यात रविवारी रात्री उशिरा झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत सकारात्मक चर्चा झाल्याने हा संप स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

बँक कर्मचाऱ्यांच्या विविध संघटनांनी ५ दिवसांचा बँकिंग आठवडा लागू करणे, सर्व शनिवार अधिकृत सुट्टी म्हणून जाहीर करणे, जुन्या निवृत्तीवेतन योजनेत अद्ययावतीकरण करणे आणि महागाई भत्त्याशी संबंधित प्रलंबित प्रश्न सोडवणे यासारख्या प्रमुख मागण्यांसाठी या संपाची हाक दिली होती. चौथ्या शनिवार आणि रविवारच्या सुट्ट्यांनंतर लागोपाठ तीन दिवस संप होणार असल्याने बँकिंग कामकाज सलग पाच दिवस विस्कळीत होण्याची शक्यता निर्माण झाली होती.

या पार्श्वभूमीवर रविवारी रात्री ९:३० वाजता इंडियन बँक्स असोसिएशन आणि बँक संघटनांच्या प्रतिनिधींमध्ये तातडीची बैठक पार पडली. या बैठकीत कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर गांभीर्याने चर्चा करण्यात आली आणि सर्व शनिवारी सुट्टी जाहीर करण्याच्या महत्त्वाच्या मुद्द्यावर तोडगा काढण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या सकारात्मक निर्णयानंतर बँक संघटनांनी आपला तीन दिवसीय संप तात्पुरता स्थगित करत असल्याची घोषणा केली. त्यामुळे आज सोमवारी देशभरातील सर्व सरकारी व खाजगी बँकांचे कामकाज पूर्ववत सुरू राहणार असून, रोख रक्कम काढणे, धनादेश वटवणे आणि इतर आर्थिक व्यवहारांसाठी नागरिकांना शाखेत जाणे शक्य होणार आहे.

# पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य

## ऑगस्ट २०२७ पर्यंत पाणी आरक्षित ठेवून उर्वरित पाण्याचे शेतीसाठी सूक्ष्म नियोजन करा : पालकमंत्री विखे

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ऑगस्ट २०२७ पर्यंत नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन आवश्यक पाणी आरक्षित ठेवावे. त्यानंतर उपलब्ध होणाऱ्या पाण्याचे शेतीसाठी काटेकोर व सूक्ष्म नियोजन करावे. पाण्याचा काटकसरीने वापर आणि संवर्धनासाठी प्रशासनासह नागरिकांनीही एकत्रित प्रयत्न करावेत. नागरिकांना नियमित पिण्याचे पाणी मिळण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, असे निर्देश पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली राहुरी तालुका टंचाई आढावा बैठक पांडुरंग लॉन्स येथे झाली. यावेळी आमदार प्राजक्त तनपुरे, आमदार अक्षय कर्डिले, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



सध्याची परिस्थिती लक्षात घेता अधिकाऱ्यांनी संवेदनशीलतेने आणि तत्परतेने काम करून शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यास प्राधान्य द्यावे. कामात हयगय आढळल्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल, असा इशारा पालकमंत्री विखे यांनी दिला. वीज वितरण विभागाने वीजपुरवठ्याचे निश्चित वेळापत्रक तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असेही त्यांनी सांगितले.

ग्रामसेवक आणि तलाठ्यांनी शेतकऱ्यांनी मांडलेल्या अडचणी व सूचनांची तातडीने दखल घेऊन कार्यवाही करावी. त्याचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

निळवंडे आणि मुळा धरणातील उपलब्ध पाण्याचे सूक्ष्म नियोजन करण्यात येणार आहे. पाणी सोडल्यानंतर त्याची गळती होणार नाही, यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. मुळा धरणातील गाळ काढण्याबाबत लवकरच कार्यवाही करण्यात येईल. कॅनॉल कमांड क्षेत्रात चारा लागवडीसाठीही प्रयत्न करण्यात येणार असल्याचे पालकमंत्री विखे यांनी सांगितले.


आमदार प्राजक्त तनपुरे यांनी राहुरी तालुक्यातील जलजीवन मिशनअंतर्गत अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली. तसेच शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी अखंडित वीजपुरवठा सुरू ठेवण्याची मागणी त्यांनी केली.

आमदार अक्षय कर्डिले यांनी तालुक्यात सरसकट शेतीचे पंचनामे करण्याची मागणी केली. पाणीपुरवठा योजनांना सौरऊर्जा पॅनेल बसवून वीज बचतीसाठी उपाययोजना कराव्यात, अशी सूचना त्यांनी केली. शेतकऱ्यांच्या थकीत कर्जाबाबत आवश्यक कार्यवाही करावी तसेच उपसा जलसिंचन योजनांमध्ये विविध गावांचा समावेश करून पाण्याचा प्रश्न सोडवावा, अशी मागणीही त्यांनी केली.

## कंपन्यांना ३० दिवसांचा रिचार्ज प्लॅन बंधनकारक

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

केंद्र सरकारने टेलिकॉम कन्झ्यूमर प्रोटेक्शन (थर्टिन्थ ॲमेंडमेंट) रेग्यूलेशन्स २०२६ सादर केले आहे. ग्राहकांचे हित डोळ्यासमोर ठेवून हा निर्णय घेण्यात आला असून, या अंतर्गत आता प्रीपेड रिचार्ज करणा–या ग्राहकांना २८ दिवसांसोबतच ३० दिवसांची व्हॅलिडिटी असलेले प्लॅन उपलब्ध करून देणे टेलिकॉम कंपन्यांना बंधनकारक केले आहे. सोबतच ज्या लोकांना मोबाईल डेटाची आवश्यकता नाही, अशा ग्राहकांसाठी मोबाईल डेटा नसलेले फक्त कॉलिंग आणि एसएमएस सुविधा उपलब्ध असलेले पॅकही उपलब्ध करून द्यावे लागणार आहेत. यात ग्राहकांना आपल्या सोईनुसार पॅक निवडीचे पूर्ण स्वातंत्र्य असणार आहे.



भाजपचे खासदार राघव चड्ढा यांनी संसदेत उचलून धरलेली मागणी अखेर केंद्र सरकार आणि टेलिकॉम रेग्युलेटरी ॲथॉरिटी ऑफ इंडियाने मान्य केली. नव्या नियमांनुसार आता टेलिकॉम कंपन्यांना ग्राहकांसाठी पूर्ण ३० दिवसांच्या व्हॅलिडिटीचे रिचार्ज प्लॅन्स उपलब्ध करून देणे बंधनकारक करण्यात आले आहे. यामुळे यूजर्सना आता वर्षातून १३ वेळा नाही तर केवळ १२ वेळाच मोबाईल रिचार्ज करावा लागणार आहे.

खरे म्हणजे अनेकदा ग्राहकांना मोबाईल इंटरनेटची गरज नसते. त्यांना फक्त व्हाईस कॉल आणि एसएमएसची सुविधा हवी असते. परंतु अशा ग्राहकांना या दोन सुविधा सुरू ठेवण्यासाठी मोबाईल डेटा पॅकचीच निवड करावी लागत होती. मात्र, आता कंपन्यांना डेटा सुविधा नसलेले आणि फक्त कॉलिंग तसेच एसएमएस सुविधा असलेले रिचार्ज पॅक उपलब्ध करून द्यावे लागणार आहेत. या दृष्टीनेही हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा आहे. दरम्यान, मी ११ मार्च रोजी संसदेत हा मुद्दा उपस्थित करून स्वस्त आणि अधिक पर्यायांची मागणी केली होती. जनतेची ही रास्त मागणी सरकारने मानली आहे, असेही चड्ढा म्हणाले.

केंद्र सरकारने टेलिकॉम कन्झ्युमर प्रोटेक्शन (तेरावी सुधारणा) रेग्युलेशन, २०२६ लागू केले. यापूर्वी टेलिकॉम कंपन्या २८ दिवसांचा महिना धरून ग्राहकांकडून वर्षातून १३ वेळा रिचार्ज करून घेत असत. मात्र, आता नव्या नियमांमुळे यूजर्सच्या पैशांची आणि वेळेची मोठी बचत होणार आहे. यामुळे चड्ढा यांनी केंद्र सरकार आणि ट्रायचे आभार मानले.

### केंद्राचा निर्णय मोबाईल ग्राहकांच्या फायद्याचा

– केंद्राच्या निर्णयामुळे कंपन्यांना २८ दिवसांऐवजी पूर्ण ३० दिवसांचा रिचार्ज प्लॅन द्यावाच लागेल.

– ज्या ग्राहकांना इंटरनेट किंवा डेटाची गरज नाही, विशेषत: ज्येष्ठ नागरिक; त्यांच्यासाठी आता फक्त इनकमिंग आणि आउटगोइंग कॉलिंग आणि एसएमएस असणारे स्वस्त व्हॉइस ओन्ली प्लॅन्स उपलब्ध करून दिले जातील. आता अनावश्यक डेटा प्लॅन्स खरेदी करण्याची सक्ती आता राहणार नाही.

SPOT NEWS

## अहिल्यानगरमध्ये ज्ञानेश कुमार यांच्या पुतळ्याला 'तुडवांजली'

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण अर्थात डखठ प्रक्रियेच्या निषेधार्थ पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेच्या वतीने रविवारी (दि. २७ सप्टेंबर) अहिल्यानगर येथील हुतात्मा स्मारकात आंदोलन करण्यात आले. यावेळी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला 'तुडवांजली' देत निषेध व्यक्त करण्यात आला. आंदोलनात ॲड. कारभारी गवळी, राजेंद्र कर्डिले, ॲड. विद्या शिंदे, दिलीप घुले, रवी सातपुते, बाळासाहेब पालवे, शाहीर कानु सुंबे, अशोक भोसले, पोपट भोसले, ॲड. वीर बहादुर प्रजापती, अशोक सब्बन, विजय शिरसाठ, ॲड. अमित थोरात, प्रकाश थोरात, ॲड. सुरेश लगड, ॲड. आनंद सूर्यवंशी, ॲड. रवींद्र रणसिंग, अल्ताफ शेख, रईस शेख, सुभाष कडलग यांच्यासह कार्यकर्ते सहभागी झाले. आंदोलकांनी मतदार यादीतील नाववगळणी, पुनर्स्थापना आणि नव्या मतदारांच्या नोंदणी प्रक्रियेत अधिक पारदर्शकता व उत्तरदायित्वाची मागणी केली. भारतीय निवडणूक आयोगाच्या डखठ प्रक्रियेदरम्यान ३० राज्ये व केंद्रशासित प्रदेशांच्या मसुदा मतदार याद्यांमधून १३ कोटींहून अधिक नावे कमी झाल्याचे द इंडियन एक्स्प्रेसच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. द इंडियन एक्स्प्रेसच्या २३ सप्टेंबरच्या वृत्तानुसार, निवडणूक आयुक्त सुखबीरसिंग संधू आणि विवेक जोशी यांनी मागील दहा महिन्यांत निवडणूक आयोगाच्या काही निर्णयांवर किमान १४ वेळा औपचारिक आक्षेप नोंदविले. हे आक्षेप नवीन मतदारांची नोंदणी, मतदारांची नावे वगळणे व पुनर्स्थापित करणे तसेच मतदार यादीच्या माहिती-तंत्रज्ञान प्रणालीशी संबंधित असल्याचे वृत्त आहे. या पार्श्वभूमीवर संधू आणि जोशी यांनी नोंदविलेल्या आक्षेपांची स्वतंत्र चौकशी करावी. आक्षेपांचे स्वरूप, त्यावर आयोगाने केलेली कार्यवाही आणि अंतिम निर्णयाची प्रक्रिया सार्वजनिक करावी, अशी मागणी पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेने केली. दरम्यान, निवडणूक आयोगाच्या सूत्रांनी या वृत्तातील अंतर्गत मतभेदांच्या दाव्याला विरोध केला असून डखठसह आयोगाचे निर्णय तिन्ही निवडणूक आयुक्तांच्या मंजुरीने घेतले जात असल्याचे स्पष्ट केले आहे. आंदोलनादरम्यान निवडणूक आयुक्तांच्या नियुक्ती प्रक्रियेबाबतही पारदर्शकता व उत्तरदायित्वाची मागणी करण्यात आली. मतदार यादी ही निवडणूक प्रक्रियेचा मूलभूत आधार असल्याने पात्र मतदाराचे नाव चुकीने वगळले जाणार नाही, यासाठी प्रभावी पडताळणी, हरकती आणि अपील यंत्रणा सक्षम करण्याची मागणी आंदोलकांनी केली. मतदार यादीतील नाववगळणीची प्रक्रिया, संधू-जोशी यांनी नोंदविलेल्या आक्षेपांची वस्तुस्थिती आणि त्यावर झालेली कार्यवाही यासंबंधी उपलब्ध नोंदी सार्वजनिक कराव्यात, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## विजय भालसिंग यांना 'गोवा सोशल एक्सलन्स अवॉर्ड' जाहीर

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक तसेच निसर्ग व पर्यावरण क्षेत्रात गेल्या दोन दशकांपासून निस्वार्थपणे कार्य करणारे वाळकी (ता. अहिल्यानगर) येथील सामाजिक कार्यकर्ते तथा पक्षीप्रेमी विजय भालसिंग यांना स्वर कला संघ, गोवा आणि समाज कल्याण संचालनालय, गोवा सरकार यांच्या वतीने 'गोवा सोशल एक्सलन्स अवॉर्ड २०२६' जाहीर करण्यात आला आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण सामाजिक व पर्यावरणपूरक कार्याची दखल घेत हा पुरस्कार जाहीर करण्यात आला असून, रविवार दि. ४ ऑक्टोबर रोजी पणजी येथे आयोजित करण्यात आलेल्या 'गोवा सोशल एक्सलन्स ॲंड इम्पॅक्ट समिट २०२६' मध्ये मान्यवरांच्या हस्ते भालसिंग यांचा गौरव करण्यात येणार आहे. संस्थेचे अध्यक्ष निहाल सावंत यांनी ही माहिती दिली. 'सेवेपासून सामाजिक परिवर्तनापर्यंत' हे ब्रीदवाक्य घेऊन पणजी येथे या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक कार्याच्या माध्यमातून समाजाला सकारात्मक दिशा देणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा गौरव या सोहळ्यात करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास आमदार तथा गोव्याचे माजी कला, क्रीडा व संस्कृती मंत्री गोविंद गावडे, आमदार प्रेमेंद शेटे तसेच अभिनेत्री श्रुती पारकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. विजय भालसिंग हे गेल्या दोन दशकांपासून विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रियपणे योगदान देत आहेत. वाळकी येथील रहिवासी असलेले भालसिंग एसटी बँकेची नोकरी सांभाळत सामाजिक कार्यासाठी वेळ देत आहेत. विशेष म्हणजे कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान अथवा वर्गणी न घेता ते अनेक सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रम स्वखर्चातून राबवत आहेत. वृक्षारोपणाबरोबरच लावलेल्या झाडांचे संवर्धन करण्यावरही त्यांचा विशेष भर असतो. वाढत्या शहरीकरणामुळे आणि सिमेंटच्या जंगलामुळे निसर्गाचा समतोल बिघडत असताना पशु-पक्ष्यांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत. उन्हाळ्याच्या दिवसांत पशु-पक्ष्यांना पाण्यासाठी भटकंती करावी लागू नये, यासाठी भालसिंग विविध ठिकाणी पाणवठे तयार करून पाण्याची व्यवस्था करतात. तसेच झाडांवर पक्ष्यांसाठी धान्य व पाण्याची भांडी बसवून त्यांच्या अन्न-पाण्याची सोय केली जाते. सिमेंटच्या वाढत्या जंगलामुळे पक्ष्यांना नैसर्गिक अधिवास कमी होत असल्याने नारळाच्या सालींपासून कृत्रिम पक्षीघरटी तयार करून ती झाडांवर बसविण्याचा उपक्रमही ते राबवत आहेत. पक्ष्यांना निवारा मिळावा आणि परिसरातील जैवविविधता टिकून राहावी, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. आषाढी वारीच्या काळात पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांच्या दिंडीची सेवा करण्याचे कार्यही भालसिंग दरवर्षी सातत्याने करतात.

# पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवून अनावश्यक खर्च टाळा

### आ. मोनिका राजळेंचे आवाहन । पाथर्डी बाजार समितीची सर्वसाधारण सभा व शेतकरी निवासचे लोकार्पण

**● पाथर्डी । वीरभूमी–**

दुष्काळाची दाहकता प्रचंड असून त्याचे परिणाम दीर्घकाळ जाणवणार आहेत. त्यामुळे पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवा, दैनंदिन खर्चात काटकसर करा, वाढदिवस व लग्नसोहळे साधेपणाने साजरे करा. दुष्काळाच्या काळात हार-तुरे, शक्तिप्रदर्शन व जाहिरातबाजीवरील खर्च टाळून तो पैसा गरजूंसाठी वापरा. प्रत्येकाने 'जगा आणि जगवा' हे धोरण आचरणात आणत दुष्काळाचा खंबीरपणे सामना करावा, असे कळकळीचे आवाहन आमदार मोनिका राजळे यांनी केले.

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आयोजित वार्षिक सर्वसाधारण सभा व शेतकरी निवासाच्या लोकार्पण सोहळ्यात त्या बोलत होत्या.

दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सत्कार समारंभ, हार-तुरे यांसारखे कार्यक्रम टाळण्याचे आवाहन करत आमदार राजळे यांनी उपस्थितांना भावनिक आवाहन केले. बाटलीतील उरलेले पिण्याचे पाणीही वाया घालवू नये. सहवासातील व्यक्तींना मानसिक आधार देण्याबरोबरच शक्य तेथे मदतीचा हात पुढे करावा, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी सभापती सुभाष बर्डे, नगराध्यक्ष अभय आव्हाड, उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे, माजी नगराध्यक्ष मृत्युंजय गर्जे, ज्येष्ठ नगरसेवक नंदकुमार शेळके, वृद्धेश्वरचे संचालक राहुल राजळे, सिंधुताई साठे, नगरसेवक बंडू बोरुडे यांच्यासह प्रमुख कार्यकर्ते, संचालक व पदाधिकारी उपस्थित होते.



राज्यातील २६५ तालुक्यांत दुष्काळी परिस्थिती जाहीर करून विविध उपाययोजना हाती घेतल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या अभिनंदनाचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. शासनाच्या टंचाई निवारण कार्यात संस्था पातळीवरून सर्वतोपरी सहकार्य करण्याचा निर्धारही यावेळी करण्यात आला.

आमदार राजळे म्हणाल्या, बाजार समितीचा कारभार चांगला, विकासाभिमुख आणि शेतकरीहिताला प्राधान्य देणारा आहे. यापूर्वी काय झाले, याचा विचार न करता नव्या उमेदीने पुढे जावे. राज्यातील ज्या सहकारी संस्थांचा कारभार वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने सुरू आहे, त्यांना भेटी देऊन त्यांच्या चांगल्या उपक्रमांची आपल्या संस्थेत अंमलबजावणी करावी.

आगामी काळात रस्ते विकासाचा मोठा लाभ पाथर्डी तालुक्याला होणार असून नगर रस्त्यावरील संस्थेच्या भूखंडाचा वापर अत्याधुनिक उपक्रमांसाठी केला जाईल. त्याचा लाभ शेतकऱ्यांना होईल. नोकरभरतीबाबत पणन मंत्री जयकुमार रावल यांच्यासोबत दोन बैठका झाल्या असून त्यातून लवकरच सकारात्मक प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

संस्थेच्या प्रगतीत विश्वस्त, व्यापारी, हमाल, मापाडी आणि शेतकरी अशा सर्व घटकांचे योगदान महत्त्वाचे आहे, असेही त्यांनी सांगितले.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील अनेक गावांत टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. टँकर भरण्यासाठी पाण्याचे स्रोत वाढविण्याबाबत प्रशासन सज्ज आहे. पाण्यासाठी भांडणे किंवा टँकरच्या पाण्याची पळवापळवी करू नये. सत्ता व पदाचा गैरवापर टँकरचे पाणी पळविण्यासाठी करू नये. गावातील कारभाऱ्यांनी पाण्याचे समान वाटप करून घ्यावे, असे आवाहन आमदार राजळे यांनी केले.

ही आणीबाणीची परिस्थिती असून प्रत्येकाच्या सत्त्वाची परीक्षा घेणारा काळ आहे. त्यामुळे सर्वांनी जबाबदारीने व समंजसपणे वागावे. गाड्या धुणे, आंघोळीसाठी अधिक पाणी वापरणे तसेच बांधकामासाठी पाण्याचा अपव्यय टाळावा. शासन, प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि गावपातळीवरील यंत्रणांनी ग्रामस्थांशी समन्वय ठेवून त्यांच्या मनस्थितीचाही विचार करावा, असे त्यांनी सांगितले.

जनावरांच्या चाऱ्याचे नियोजन करण्यासाठी पशुगणना महत्त्वाची असून निश्चित आकडा उपलब्ध झाल्यास चारा डेपोचे नियोजन करणे सुलभ होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सभापती सुभाष बर्डे यांनी केले. उपसभापती कुंडलिक आव्हाड यांनी स्वागत केले. सचिव बाळासाहेब बोरुडे यांनी अहवाल वाचन केले. सूत्रसंचालन राजीव सुरवसे यांनी केले, तर नारायण पालवे यांनी आभार मानले.

## पारनेरचे डॉ. आर.जी सय्यद यांना 'कर्म तपस्वी पुरस्कार' प्रदान

**● पारनेर । वीरभूमी–**

मराठा सेवा संघ प्रणित मराठा पतसंस्था संयुक्त विद्यमाने आयोजित जीवन गौरव आणि गुण गौरव वितरण पुरस्कार महाराष्ट्र राज्य विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांच्या हस्ते पारनेर शहरातील आनंद हॉस्पिटलचे डॉ. आर. जी. सय्यद यांना कर्म तपस्वी पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी श्रीमंत कोकाटे, विजयकुमार ठुबे, मृदु व जलसंधारण माजी सचिव सुनील चव्हाण, जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे, जि.प.सदस्य सचिन जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.



डॉ. सय्यद यांनी संभाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून सन १९८९मध्ये एम बी बी एस ची पदवी प्राप्त केली. तेव्हापासून ते पारनेर येथील आनंद हॉस्पिटलमध्ये अविरतपणे रुग्णसेवा बजावत आहेत. वैद्यकीय व्यवसायाकडे केवळ व्यवसाय म्हणून न पाहता, मानवसेवेचे माध्यम म्हणून त्यांनी केलेले कार्य समाजासाठी प्रेरणादायी ठरले आहे.

सन्मानपत्रात त्यांच्या कार्याचा गौरव करताना म्हटले आहे की, डॉ. सय्यद यांनी ज्ञान, विचार आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर समन्वय साधत समाजप्रबोधनाचे कार्य केले आहे. वैद्यकीय क्षेत्रासोबतच संत, सूफी परंपरा आणि भारतीय संविधान या विषयांवरही त्यांनी प्रवचनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले आहे. माणसातील सद्भावना, समता आणि बंधुता या विचारांवर त्यांनी नेहमीच भर दिला आहे.

डॉ. सय्यद हे मराठा सेवा संघाचे सचिव म्हणूनही कार्यरत आहेत. सामाजिक एकता, सद्भावना आणि बंधुभाव वृद्धिंगत करण्यासाठी ते नेहमी प्रयत्नशील असतात. हिंदू-मुस्लिम ऐक्य तसेच सामाजिक सद्भावनेचे ते जिवंत उदाहरण आहेत. मराठा सेवा संघाचे विचार मुस्लिम आणि बहुजनांमध्ये पोहोचवण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. संत तुकाराम महाराज यांच्यावर त्यांनी लिहिलेले पुस्तक देखील लोकप्रसिद्ध आहे.सन्मानपत्रात पुढे नमूद केले आहे, आपल्या कार्यतत्परतेची ज्योत अखंड तेवत राहो; आपल्या अनुभवाची अमूल्य शिदोरी भावी पिढ्यांना दिशादर्शक ठरो. आपल्या त्यागमय जीवनमूल्यांचा दीप समाजमनात प्रज्वलित राहो आणि आपल्या सामाजिक बांधिलकीची प्रेरणा नव्या पिढ्यांच्या कर्तृत्वाला बळ देत राहो. या पुरस्कारामुळे डॉ. सय्यद यांच्या प्रदीर्घ, समर्पित आणि प्रेरणादायी कार्याला संस्थेने अभिवादन केले आहे. त्यांच्या या सामाजिक, वैद्यकीय आणि प्रबोधनात्मक कार्याची दखल घेत त्यांना 'कर्म तपस्वी पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. यामुळे पारनेरकरांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

## भोजडे गावाने प्रामाणिक सहकार जपला : निलेश महाराज रोढे

**● कोपरगाव । वीरभूमी –**

नुकतीच भोजडे नं २ सेवा सोसायटीची २७ वी वार्षिक सभा आणि १५ वा आदर्श सभासद पुरस्कार वितरण सोहळा अनोख्या पद्धतीने पार पडला. पुरस्काराचे वितरण नेवासा येथील रामकृष्णाश्रमाचे प्रमुख ह.भ.प.निलेश महाराज रोढे आणि कोपरगाव येथील ओम शांती ध्यान केंद्र'च्या प्रमुख ब्रम्हकुमारी सरला दीदीजी यांच्या शुभहस्ते करण्यात आले.



यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन मुकुंद शहाराम सिनगर होते. कोपरगाव तालुक्यातील पूर्व भागातील शेतकऱ्यांची कामधेनू म्हणून भोजडे सेवा सोसायटी आदर्शवत असून आपल्या सभासदांच्या सर्वांगीण विकासासाठी कटीबद्ध असते. गेल्या १५ वर्षापासून संस्था आपल्या एकूण सभासदांपैकी निकषाद्वारे निवड करून आदर्श सभासद पुरस्कार देते. ज्यात सन्मानचिन्ह आणि रोख ११११/- रुपये मात्र दिले जातात. हा उपक्रम अत्यंत प्रेरणादायी असून यामुळे सोसायटी वसूल वाढण्यात मोठी मदत झालेली आहे. यावर्षी आदर्श सभासद २०२६ पुरस्कार संस्थेच्या सभासद सौ. मुक्ताबाई रामभाऊ साबळे यांना देण्यात आला. सभासदांच्या विश्वासाच्या बळावर आदर्श संस्था उभी करू शकलो असल्याचे प्रामाणिक मत संस्थेचे चेअरमन मुकुंद सिनगर यांनी व्यक्त केले.

यावेळी अनेकांनी संस्थेच्या कामकाजाचे कौतुक करत छोट्या गावातही सहकार सक्षमपणे पुढे जात असल्याने अभिमान व्यक्त केला. त्यामुळे भोजडे गावाने प्रामाणिक सहकार जपल्याची भावना ह भ प निलेश महाराज रोढे यांनी व्यक्त केली. त्यानंतर आदरणीय सरला दीदींनी अध्यात्मिक मार्गदर्शन करत सहकारतील सेवा ही ईश्वर सेवा असून याचं वाटेवर चालत रहा, संस्था नेहमीच प्रगती करेल यांची खात्री व्यक्त केली.

यावेळी भोजडे सोसायटी १ चे चेअरमन रंगनाथ नाना सीनगर, लोकनियुक्त सरपंच सुधाकर वादे, तंटामुक्ती अध्यक्ष संभाजी तात्या सीनगर, प्रगतीशील शेतकरी अनंत तात्या सीनगर, उपसरपंच दिलीप सीनगर, धोत्रा येथील विष्णू पाडेकर, साईभक्त सागर करडे, संतोष सीनगर, विजय सीनगर, शहाराम सीनगर, सुधाकर सीनगर, गोरख अण्णा गलांडे, संस्थेचे व्हा.चेअरमन दिनकर सिनगर, संचालक सर्व ज्ञानेश्वर सिनगर, अशोक मंचरे, रामनाथ चंदणे, दीपक धट, रावसाहेब सिनगर, फकीरचंद जेऊघाले, राजेंद्र घनघाव यासंह सर्व संचालक मंडळानी मेहनत घेतली.

सभेचे सूत्रसंचालन सागर करडे, प्रास्ताविक गणेश बारहाते तर शेवटी मुकुंद सिनगर यांनी आभार मानले.

## कर्मवीरांच्या विचारांतूनच पुरोगामी महाराष्ट्राची जडणघडण : ॲड. भगीरथ शिंदे

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम म्हणजे शिक्षण असून, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बहुजन समाजाच्या उत्थानासाठी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. कर्मवीर हे महात्मा फुले यांच्या सत्यशोधक विचारांचे वारसदार होते. त्यांच्या विचारांतूनच पुरोगामी महाराष्ट्राची जडणघडण झाली. आजच्या शिक्षकांनीही कर्मवीरांचा विचारवारसा जपावा, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. भगीरथ शिंदे यांनी केले.

महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात रयत संकुलाच्या वतीने आयोजित कर्मवीर भाऊराव पाटील जयंती समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री बबनराव पाचपुते होते.

प्रमुख वक्ते तथा रयत शिक्षण संस्थेचे माध्यमिक विभागाचे सहसचिव बंडू पवार म्हणाले, कर्मवीरांना महात्मा फुले, महात्मा गांधी आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांची प्रेरणा मिळाली. त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून बहुजन समाजाच्या विकासाचा पाया रचला. आजच्या युवकांनी कौशल्याधिष्ठित शिक्षण घेऊन व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधावा.

रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना कर्मवीरांच्या त्यागाचे स्मरण ठेवण्याचे आवाहन केले. विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे यांनीही मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणात बबनराव पाचपुते म्हणाले, रयत शिक्षण संस्था ही केवळ शिक्षण देणारी नव्हे, तर माणसे घडवणारी संस्था आहे. कर्मवीरांचा विचारवारसा रयतच्या माध्यमातून पुढे नेला जात आहे.

प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रतिमापूजनानंतर श्रीमंत राजमाता कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी रयत गीत सादर केले. जनरल बॉडी सदस्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल गणेश भोस यांचा, तर पीएच. डी. पदवी प्राप्त केल्याबद्दल डॉ. देवेंद्र बहिरम यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. राजेंद्र ठाकरे यांनी संपादित केलेल्या 'भगीरथ' नियतकालिकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



कर्मवीर जयंतीनिमित्त महाविद्यालयात श्रमप्रतिष्ठा दिन साजरा करण्यात आला. तसेच रांगोळी, वक्तृत्व, निबंध आणि पुष्पसजावट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अहवाल वाचन प्राचार्य दिलीप भुजबळ आणि मुख्याध्यापिका वर्षा भोईटे यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. देवेंद्र बहिरम, प्रा. संजय फटे आणि प्रा. संदीप दरेकर यांनी केले. आभार पर्यवेक्षक प्रा. रत्नाकर झिटे यांनी मानले.

यावेळी सुभाष गांधी, कुंडलिकराव दरेकर, माजी विभागीय अधिकारी तुकाराम कन्हेरकर, महावीर पटवा, रवीशेठ दंडनाईक, रत्नप्रभा बोरुडे, ज्योत्स्ना भंडारी, उद्योजक संजय मचे, नगरसेवक, मुख्याध्यापक राजेंद्र खेडकर, डॉ. ज्ञानदेव भोसले उपस्थित होते.

# 'लोकसंवाद-२०२६'मधून शेवगावात शासकीय योजनांचा जागर

### गणेशोत्सवाच्या माध्यमातून नागरिकांना विविध योजना, सायबर सुरक्षा व सामाजिक जबाबदारीची माहिती

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, लोककल्याणकारी निर्णय आणि जनहिताच्या उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'लोकसंवाद-२०२६' या जनजागृती उपक्रमांतर्गत शेवगाव येथे शासकीय योजनांचा जागर करण्यात आला. गणेशोत्सवाच्या निमित्ताने नागरिकांची मोठी उपस्थिती असलेल्या ठिकाणी योजनांची माहिती थेट नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आली.

जिल्हा माहिती कार्यालय, अहिल्यानगर आणि शेवगाव शहरातील माळीगल्ली येथील शिवशक्ती युवक मंडळाच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी पोलीस निरीक्षक मोहन बोरसे आणि नायब तहसीलदार निलेश वाघमारे यांनी नागरिकांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

जिल्हा माहिती अधिकारी मुकुंद चिलवंत यांनी 'लोकसंवाद-२०२६' उपक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. नागरिकांनी शासकीय योजनांची केवळ माहिती न घेता पात्रतेनुसार त्यांचा लाभ घ्यावा आणि ही माहिती कुटुंबीयांसह परिसरातील इतर नागरिकांपर्यंत पोहोचवावी, असे त्यांनी सांगितले.

नागरिकांचा सहभाग असलेल्या सार्वजनिक उपक्रमांच्या माध्यमातून शासकीय योजना व जनहिताच्या निर्णयांची माहिती पोहोचविल्यास शासन आणि नागरिकांमधील संवाद अधिक प्रभावी होण्यास मदत होते, असेही चिलवंत यांनी नमूद केले.

पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांनी सायबर सुरक्षा आणि समाजमाध्यमांच्या वापराबाबत मार्गदर्शन केले. समाजमाध्यमांवर वैयक्तिक माहिती शेअर करताना सावधगिरी बाळगावी. अनोळखी व्यक्तींकडून येणारे संशयास्पद संदेश, लिंक किंवा फोनला प्रतिसाद देताना काळजी घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

नायब तहसीलदार निलेश वाघमारे यांनी ज्येष्ठ नागरिक व महिलांसाठीच्या विविध शासकीय योजनांची माहिती दिली. संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम तसेच शिधापत्रिका काढण्याची प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन केले. पत्रकार अलीम शेख यांनी स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक जबाबदारीबाबत मार्गदर्शन केले. परिसर स्वच्छ ठेवणे, पर्यावरणपूरक उपक्रमांना प्रोत्साहन देणे आणि सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतेबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले.



कार्यक्रमास मंडळाचे मार्गदर्शक बाळासाहेब डाके, अनिकेत डाके, मनीष बाहेती, शिवशक्ती युवक मंडळाचे अध्यक्ष नवनाथ डाके, मल्हारी घुसाळे, दत्तात्रय घोंगडे, प्रदीप लोंढे, सोमनाथ घोंगडे, डाके मेजर, अनिल खैरे, दत्तात्रय फुंदे आदी उपस्थित होते.

## SPOT NEWS

### निंबळकच्या नवरात्रोत्सवासाठी दोन शक्तीपीठांची संयुक्त अग्निज्योत

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

अहिल्यानगर तालुक्यातील निंबळक येथील मानाच्या देवीचा नवरात्रोत्सव यंदा आगळ्या-वेगळ्या धार्मिक परंपरेमुळे विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे. शिवप्रहार संघटनेचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य, ज्योतिषशास्त्राचे अभ्यासक व प्रसिद्ध ज्योतिषतज्ज्ञ संतोष घोलप यांच्या पुढाकारातून यंदा गुवाहाटी येथील कामाख्या देवी आणि त्रिपुरा राज्यातील त्रिपुरा सुंदरी या दोन प्रमुख शक्तीपीठांची संयुक्त पवित्र अग्निज्योत निंबळक येथे येणार आहे. गेल्या वर्षी निंबळकच्या नवरात्रोत्सवासाठी आसाममधील गुवाहाटी येथील प्रसिद्ध कामाख्या देवी मंदिरातून पवित्र अग्निज्योत आणण्यात आली होती. त्याच धार्मिक परंपरेला पुढे नेत यंदा कामाख्या देवी व त्रिपुरा सुंदरी या दोन्ही शक्तीपीठांच्या अग्निज्योतींचा दिव्य संगम निंबळक येथे घडवून आणला जाणार आहे. या उपक्रमासाठी दोन स्वतंत्र भक्तगट रवाना झाले असून येथे शुभारंभ नारळ वाढून शिवकन्या कु.मयुरी आदमाने, कु. संस्कृती बोरुडे, कु.काव्या कुर्हाडे, कु.संमृद्धी मुरूमकर, कु.समिक्षा मुरूमकर यांच्या हस्ते करण्यात आले असून पहिला गट रस्ते मार्गाने महाराष्ट्र, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, सिक्कीम आणि आसाम या राज्यांतून सुमारे २६०० किलोमीटरचा प्रवास करून गुवाहाटी येथील कामाख्या देवी मंदिरात पोहोचणार आहे. तर दुसरा गट हवाई मार्गाने त्रिपुरा राज्यातील प्रसिद्ध त्रिपुरा सुंदरी मंदिरात जाऊन तेथून रस्ते मार्गाने पवित्र अग्निज्योत घेऊन सुमारे ६०० किलोमीटरचा प्रवास करत गुवाहाटी येथील कामाख्या देवी मंदिरात दाखल होणार आहे. गुवाहाटी येथे कामाख्या देवी आणि त्रिपुरा सुंदरी या दोन्ही शक्तीपीठांच्या पवित्र अग्निज्योती एकत्र केल्या जातील. त्यानंतर ही संयुक्त दिव्य अग्निज्योत घेऊन भक्तांचा समूह पुन्हा निंबळकच्या दिशेने प्रवास करणार आहे. अशा प्रकारे एकूण सुमारे ३१०० किलोमीटरचा धार्मिक प्रवास पूर्ण करून ही अग्निज्योत निंबळकच्या नवरात्रोत्सवस्थळी आणण्यात येणार आहे.

### अगस्ति देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त ह. भ. प. बद्रीनारायनजी मोतीलालजी मुंदडा यांचे निधन

**● अकोले । वीरभूमी–**



अकोले माहेश्वरी समाजाचे प्रमुख पंच व अगस्ति देवस्थान ट्रस्ट चे विश्वस्त ह. भ.प. बद्रीनारायनजी मोतीलालजी मुंदडा (वय ९१, रा. अकोले) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सुना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. अगस्ती देवस्थान ट्रस्टचे अनेक वर्ष त्यांनी अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली. अगस्ती प्रासादिक भजनी मंडळाचे ते संस्थापक होते. जुन्या पिढीतील किराणा व्यवसायिक म्हणून ते सर्वदूर परिचित होते. अकोले येथील अमरधाम मध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अकोले येथील व्यापारी श्यामसुंदर मुंदडा व सौ.विमल श्यामसुंदर काबरा यांचे ते वडील होत. भाजपच्या ज्येष्ठ नेत्या सुनिता रामेश्वर मुंदडा व ज्ञानवर्धिनी प्राथमिक शाळेच्या चेअरमन स्मिता श्यामसुंदर मुंदडा यांचे ते सासरे होत. प्रतीक मुंदडा, ॲड. योगेश मुंदडा, सौ. प्राची स्वप्निल जाजू यांचे ते आजोबा होत.

### रमेश भालेराव यांचे निधन

**● अकोले । वीरभूमी–**



अकोले ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच, कुंभार संघटनेचे प्रदेश सरचिटणीस व वीट भट्टी व्यवसयिक रमेश शंकर भालेराव (वय ७५, रा. कुंभारवाडा, अकोले) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, दोन भाऊ, तीन बहिणी, नातवंडे असा परिवार आहे. मॉर्डन हायस्कूल अकोले येथे स्थानिक स्कुल कमिटी सदस्य म्हणून त्यांनी काम पाहिले होते. कुंभार समाजाचे तालुकाध्यक्ष, जिल्हा व राज्य पदाधिकारी म्हणून त्यांनी काम पाहिले. त्यांच्यावर अकोले येथील अमरधाममध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. वीट भट्टी व्यावसायिक ज्ञानेश्वर व नितीन भालेराव, सौ. वंदना विठ्ठल लोणकर यांचे ते वडिल होत. तर अभियंता देविदास भालेराव, प्रकाश भालेराव, विमल वाकचौरे, सुधा रसाळ, निर्मला लोखंडे यांचे ते बंधू होत.

### नियोजित एमआयडीसीच्या जागेत

# बेकायदा माती उत्खनन; चार डंपर जप्त

**बेलवंडी पोलिसांची पहाटे धडक कारवाई । १ कोटी ४० लाख ७२ हजारांचा मुद्देमाल हस्तगत**

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

तालुक्यातील पिसोरे-लोणी परिसरातील नियोजित एमआयडीसीच्या जागेतून बेकायदा माती उत्खनन करून वाहतूक करणाऱ्या चार डंपरवर बेलवंडी पोलिसांनी रविवारी (दि. २७) पहाटे धडक कारवाई केली. या कारवाईत चार डंपर आणि त्यातील सुमारे २४ ब्रास माती असा एकूण १ कोटी ४० लाख ७२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



बेलवंडी पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांना पिसोरे-लोणी व्यंकनाथ परिसरातील नियोजित एमआयडीसीच्या जागेतून बेकायदा माती उत्खनन करून डंपरमधून वाहतूक सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी पंचांसह पथक तयार करून पहाटे सुमारे तीन वाजता चिंभळे गावच्या शिवारात येळपणेकडे जाणाऱ्या रस्त्यावर सापळा रचला.

चिंभळे गावाकडून येळपणेच्या दिशेने एकापाठोपाठ चार डंपर येताना दिसले. पहाटे साडेतीनच्या सुमारास पोलिसांनी हे डंपर अडवून तपासणी केली असता, प्रत्येक डंपरमध्ये सुमारे सहा ब्रास माती आढळली. चालकांकडे माती वाहतुकीचा परवाना नव्हता. ही माती नियोजित एमआयडीसीच्या जागेतून भरल्याचे चालकांनी पोलिसांना सांगितले.

जप्त करण्यात आलेल्या चारही डंपरची किंमत प्रत्येकी ३५ लाख रुपये, अशी एकूण १ कोटी ४० लाख रुपये आहे. तर २४ ब्रास मातीची किंमत सुमारे ७२ हजार रुपये आहे.

या प्रकरणी संतोष अशोक अडागळे (वय २३, रा. टाकळी लोणार), संतोष काशिनाथ इथापे (वय ४३), यशवंत प्रकाश पवार (वय २१, दोघेही रा. लोणी व्यंकनाथ) आणि मनोज शत्रुघनप्रसाद गुप्ता (वय ४०, रा. शहडोल, मध्य प्रदेश) यांच्याविरुद्ध बेलवंडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३(५) तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ३/१५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास महिला पोलीस हेडकॉन्स्टेबल प्रांजली साळवे करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मूमक्का सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलब्रमे कर्जत विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षीरसागर आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार रोहिदास खेडकर, भाऊसाहेब यमगर, दादासाहेब क्षिरसागर, भाऊसाहेब शिंदे, शरद गांगर्डे आणि मच्छिंद्र बर्डे यांच्या पथकाने केली.

## जादूच्या प्रयोगांनी विद्यार्थ्यांमध्ये उत्साह

**कवठे येमाईत कर्मवीर जयंती सप्ताह । मनोरंजनातून वैज्ञानिक दृष्टिकोनाचा संदेश**

**● शिरूर । वीरभूमी –**

रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनियर कॉलेज ऑफ आर्ट्स, कवठे येमाई येथे १३९ व्या कर्मवीर जयंती सप्ताहानिमित्त 'अरुण वाळुंज टॉक्स' व्यासपीठाच्या माध्यमातून 'जादूचे प्रयोग – मनोरंजनातून शिक्षणाकडे' हा विशेष कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी चित्रपट दिग्दर्शक भरतशेठ रोडे प्रमुख उपस्थित होते.



जादूगार रोहित कुमार चऱ्होलीकर यांनी विविध आकर्षक जादूचे प्रयोग सादर करून विद्यार्थ्यांचे मनोरंजन केले. कबुतराची जादू, रुमालाची जादू आदी प्रयोगांनी विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. या प्रयोगांच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मूलन, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मनोरंजनातून शिक्षणाचा संदेश देण्यात आला.

प्राचार्य शिवराम मुंजावडे यांनी जादू म्हणजे कोणताही चमत्कार नसून हातचलाखी आणि विज्ञानाचा सुरेख संगम असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे संयोजक व चित्रपट गीतकार अरुण वाळुंज यांनी 'राजे छत्रपती', 'कट्टी बट्टी', 'चांदोबाची आई', 'भीमानं संविधान लिव्हलं रं' यांसह विविध गीतांच्या रचना सादर करून विद्यार्थ्यांचे मनोरंजन केले.

यावेळी महेंद्र दरवडे, शरद बोंबे, मच्छिंद्रनाथ करंजकर, संतोष सोनवणे, शिल्पा नेहेरे, हेमा कड्डे, सत्यश्री थोरात, शिवराम मुंजावडे, कामिनी गवळी, उज्ज्वला पवार, सखाराम दाभाडे, सविता धसाडे, दर्शना राजगुरू यांच्यासह शिक्षकवृंद उपस्थित होते.

## दहेगाव बोलकाचे काळे गटाचे सरपंच भारत चौधरी यांचे सरपंचपद अखेर रद्द

**जात वैधता प्रमाणपत्र मुदतीत सादर न केल्याने जिल्हाधिकाऱ्यांची कारवाई**

**● कोपरगाव । वीरभूमी–**

तालुक्यातील दहेगाव बोलका ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त सरपंच भारत विठ्ठल चौधरी यांचे सरपंचपद आणि ग्रामपंचायत सदस्यत्व अखेर रद्द करण्यात आले आहे. अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या सरपंचपदावर निवडून आल्यानंतर विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी ही कारवाई केली.

दहेगाव बोलका ग्रामपंचायतीची २०२३ मध्ये सार्वत्रिक निवडणूक झाली होती. या निवडणुकीत भारत विठ्ठल चौधरी यांची अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवरून लोकनियुक्त सरपंच म्हणून निवड झाली होती. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम १०(१) (अ) नुसार राखीव प्रवर्गातून निवडून आलेल्या सदस्याने अथवा सरपंचाने विहित कालावधीत सक्षम प्राधिकरणाकडून मिळालेले जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक होते मात्र असे घडले नाही.या प्रकरणी २०२३ मधील निवडणुकीनंतर पंकज अशोक गायकवाड यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे तक्रार दाखल केली होती.

मात्र, चौधरी यांनी निर्धारित १२ महिन्यांच्या कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नसल्याने त्यांच्याविरुद्ध जिल्हाधिकारी कार्यालयात कारवाईची प्रक्रिया सुरू झाली.

या तक्रारीत भारत चौधरी यांनी जात वैधता प्रमाणपत्र मिळविताना शासनाची दिशाभूल केल्याचा तसेच चुकीची वंशावळ सादर केल्याचा आरोप करण्यात आला होता. वेगळ्या आजोबांचे नाव दाखवून कागदपत्रांच्या आधारे जात प्रमाणपत्र मिळविल्याचा आक्षेपही तक्रारीत घेण्यात आला होता. या प्रकरणी प्रांताधिकारी तसेच जात वैधता समिती, नाशिक यांच्याकडेही स्वतंत्र तक्रार करण्यात आली होती.

तक्रारीतील आक्षेप, संबंधित कागदपत्रे आणि प्रकरणातील कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी सन २०२५ मध्ये भारत चौधरी यांच्या अपात्रतेचा निर्णय दिला होता. मात्र, हा निर्णय झाल्यानंतरही भारत चौधरी यांनी तातडीने सरपंचपदाचा कार्यभार सोडला नाही. त्यांनी साधारण एक वर्ष सरपंचपदाचा कार्यभार सुरू ठेवल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणात अर्जदारांच्या वतीने ॲड. गोरख पालवे तसेच ॲड. गणेश मोकळ यांनी कामकाज पाहिले. अखेर विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याच्या कारणावरून भारत चौधरी यांचे सरपंचपद आणि ग्रामपंचायत सदस्यत्व दोन्ही रद्द करण्यात आले आहे.

## जिल्ह्यातील गुणवंत खेळाडूंचा 'प्रवरा क्रीडा रत्न' पुरस्काराने पालकमंत्री यांच्या हस्ते गौरव

**● शिर्डी । वीरभूमी –**

खेळाडूच्या यशात शिस्त, परिश्रम, जिद्द याबरोबरच पालकांचे योगदान मोलाचे आहे. खेळाडूंना जागतिक दर्जाच्या सुविधा मिळाव्यात यासाठी प्रवरा परिसरात लवकरच एक अत्याधुनिक 'स्पोर्ट्स अकॅडमी' सुरू केली जाईल, खेळाडूंच्या प्रगतीसाठी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभे असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील केले.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित अहिल्यानगर जिल्ह्यातील राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर यश मिळवलेल्या खेळाडूंचा प्रवरा क्रीडा रत्न पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रमात ते बोलत होते. प्रवरा परिसरात आयोजित 'प्रवरा क्रीडा रत्न सन्मान सोहळा २०२६-२७' मध्ये शालेय तसेच विविध अधिकृत क्रीडा संघटनांच्या आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये सहभागी होऊन उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ७४५ खेळाडूंचा सन्मान पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते पुरस्कार देऊन करण्यात आला.

यावेळी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारप्राप्त प्राध्यापक सुनील जाधव, अक्षय पवार, शुभांगी रोकडे, कोमल वाकळे, शंकर गदाई, गणेश पवार, फिजा सय्यद, शार्दुल गागरे व प्रणिता सोनम यांचा प्राथमिक स्वरूपात पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.



पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, शिस्त, परिश्रम आणि जिद्दीच्या जोरावर खेळाडू घडतात. खेळाडूंच्या यशामध्ये पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पालकांनी आपल्या पाल्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांना आवडणाऱ्या खेळात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिल्यामुळे गुणवंत खेळाडू घडत आहेत. अशा सन्माना मुळे इतर खेळाडूंनाही प्रेरणा मिळते.

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये टिकण्यासाठी गुणवंत आणि नेपुण्य प्राप्त करण्यासाठी प्रशिक्षण संस्था महत्वपूर्ण भूमिका निभावत असते. यासाठी प्रवरा परिसरात दर्जेदार सुविधा युक्त स्पोर्ट्स अकॅडमी सुरू करण्याचा मानस आहे. असे पालकमंत्री विखे पाटील यांनी सांगितले. यावेळी माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, डॉ. सुष्मिता विखे पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे, क्रीडा क्षेत्रातील मान्यवर, कैलास नाना तांबे, गुणवंत खेळाडू, पालक प्रशिक्षक, खेळाडू व पालक उपस्थित होते. जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांनी आभार मानले.

# ज्ञानाची शिदोरीच आयुष्याची खरी कमाई; विद्यार्थ्यांनी ज्ञानवंत व्हावे

**आ. आशुतोष काळे । तिडके पाटील विद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील जयंती उत्साहात साजरी**

**● कोपरगाव । वीरभूमी –**

आजचे युग हे स्पर्धा, तंत्रज्ञान आणि माहितीचे आहे. या काळात केवळ परीक्षेतील गुणांपेक्षा विद्यार्थ्यांनी ज्ञान, कौशल्य आणि विचारशक्ती आत्मसात करणे अधिक महत्त्वाचे आहे. पैसा, संपत्ती आणि भौतिक साधने काळानुसार कमी-जास्त होऊ शकतात; मात्र ज्ञानाची शिदोरी ही आयुष्यभर साथ देणारी आणि कधीही चोरीला न जाणारी संपत्ती आहे. ज्ञानामुळे व्यक्तीला आत्मविश्वास आणि जीवनातील आव्हानांवर मात करण्याचे सामर्थ्य मिळते. त्यामुळे रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या शिक्षणाच्या संधीचे सोने करून विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांचे ज्ञान आत्मसात करावे आणि या ज्ञानाच्या बळावर आपले भविष्य घडवावे असे प्रतिपादन आ.आशुतोष काळे यांनी केले. कोपरगाव तालुक्यातील चासनळी येथील रयत शिक्षण संस्थेच्या मारुतीराव दगडूजी तिडके पाटील माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३९ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी म्हणून रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. 'कमवा व शिका' योजनेतून अनेक विद्यार्थ्यांनी स्वावलंबीपणे शिक्षण पूर्ण केले. विद्यार्थ्यांनी या विचारांचा आदर्श घेऊन मन लावून अभ्यास करावा, तसेच शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रातही प्रगती करावी.क्रीडा, कला, विज्ञान आदी क्षेत्रांतही आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवावा, असे आवाहन आ. आशुतोष काळे यांनी केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांनी प्रेरित होऊन मा. खा. स्व.कर्मवीर शंकररावजी काळे यांनी रयत शिक्षण संस्थेच्या वाढीसाठी मोलाचे योगदान दिले. त्यांचा हा वारसा माजी आमदार अशोकराव काळे यांनी अविरतपणे पुढे नेला.पद्मविभूषण शरदचंद्रजी पवार साहेब व दिवंगत उपमुख्यमंत्री स्व.अजीतदादा पवार यांच्या आशीर्वादाने मला देखील उतर विभागाची जबाबदारी मिळाली. ती जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडून रयत शिक्षण संस्था आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले.काळे परिवाराची रयत शिक्षण संस्थेशी असलेला ऋणानुबंध आणि बांधिलकी यापुढेही कायम ठेवत रयत शिक्षण संस्थेच्या शाळा महाविद्यालयाच्या अडचणी सोडविण्यासाठी सर्वो तोपरी सहकार्य करणार असल्याचे आ.आशुतोष काळे यांनी यावेळी सांगितले.



याप्रसंगी मायभूमी सोशल फाउंडेशन, आधार फाउंडेशन व कृष्णा चांदगुडे यांच्या वतीने गुणवंत, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप करण्यात आले. तसेच उद्योजक विनोदजी आहिरे यांनी शाळेसाठी २१ हजार रुपयाच्या खुर्च्या भेट दिल्या. विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसाचे वाटप करण्यात आले. तसेच रांगोळी प्रदर्शन व ए.आय. प्रदर्शनाचे उद्घाटन प्रमुख मान्यवरांचे शुभहस्ते करण्यात आले.

यावेळी भास्करराव चांदगुडे, सोमनाथ घुमरे, सुभाषराव गाडे, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन दिनार कुदळे, संचालक डॉ. मच्छिंद्र बर्डे, सचिन चांदगुडे, रयत शिक्षण संस्था उत्तर विभाग सल्लागार मंडळाचे सदस्य सोमनाथ चांदगुडे, जनरल बॉडी सदस्य अरुण चंद्रे, गौतम बँकेचे संचालक श्रीकांत तिरसे, गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्टचे कार्यकारी संचालक दौलतीराव मोरे,अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष कृष्णा चांदगुडे, सुनिल आहिरे, विठ्ठलराव जामदार, सुनिल गाडे, पुरुषोत्तम गाडे, ज्ञानेश्वर चांदगुडे, अशोकराव माळी, हरिभाऊ चांदगुडे, किरण चांदगुडे, कैलास माळी, बापूसाहेब कासोदे, डॉ.संतोष पऱ्हे, अनिल चांदगुडे, बाळासाहेब पायमोडे, सरपंच नानासाहेब बनसोडे, उपसरपंच विनायक गाडे, पोलीस पाटील प्रकाश शिंदे, स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य महेश गाडे, आण्णासाहेब चांदगुडे, प्राचार्य एस.यु. दवंगे, सर्व शिक्षकवृंद, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व स्वागत पर्यवेक्षक पी.ए.निळकंठ यांनी केले. सूत्रसंचालन आर.के. मोरे व डी. एन. कुशारे यांनी केले तर आभार एन.आर.कदम यांनी मानले.

### सखाराम बुगे यांच्या अध्यक्षतेखाली पारनेर पश्चिम भाग सोसायटीची बुधवारी सभा

**● पारनेर । वीरभूमी–**

पारनेर पश्चिम भाग विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लिमिटेडची ६८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार, दि. ३० सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता संस्थेच्या नवी पेठ, पारनेर येथील कार्यालयात होणार आहे. संस्थेचे चेअरमन सखाराम लक्ष्मण बुगे यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा होणार असून, सर्व सभासदांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. संस्थेचे सचिव एस. एम. रोकडे, सहसचिव अविनाश जोशी व उपाध्यक्ष शिवाजी विठ्ठलराव सोबले यांच्या स्वाक्षरीने सभेची नोटीस प्रसिद्ध करण्यात आली आहे. सभेत एकूण ११ विषयांवर चर्चा होणार आहे.

सभेपुढे दि. २२ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे, सन २०२५-२६ चे आर्थिक पत्रके वाचून मंजूर करणे, महाराष्ट्र राज्य पतपुरवठा योजनेअंतर्गत सहाय्य घेण्याबाबत व बँकेकडे मंजुरी पाठविण्याचे अधिकार व्यवस्थापन समितीला देणे, सन २०२५-२६ च्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालाचे वाचन करून नोंद घेणे तसेच मागील लेखापरीक्षणातील दोष-दुरुस्ती अहवाल सादर करणे, या विषयांचा समावेश आहे.

सन २०२६-२७ साठी सहकार आयुक्त व निबंधकांनी प्रमाणित केलेल्या पॅनेलमधून वैधानिक लेखापरीक्षकाची नियुक्ती व मानधन निश्चित करणे, सन २०२४-२५ मधील मंजूर तरतुदीपेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे तसेच सन २०२६-२७ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्याबाबतही चर्चा होणार आहे.

याशिवाय संस्थेच्या सभासदांकडील थकबाकीबाबत विचारविनिमय, नवीन सभासदांना कर्ज देणे व बँकेकडून कर्ज घेण्याबाबत चर्चा, सभासदांना सहकार प्रशिक्षण देणे, संचालक मंडळ व त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे तसेच अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी उपस्थित होणाऱ्या विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे.

पारनेर तालुक्यातील शेतकरी व सभासदांसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या या संस्थेच्या सभेत आर्थिक प्रगती, कर्जवाटप, थकबाकी वसुली आणि आगामी वर्षाच्या नियोजनाबाबत चर्चा होणार आहे. त्यामुळे सर्व सभासदांनी वेळेत उपस्थित राहावे, असे संस्थेने कळविले आहे.

वीरभूमी

हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.

* संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# प्रतिकूल परिस्थितीतही उच्चांकी ऊस गाळप करू

## माजी आमदार नरेंद्र घुले पाटील । लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याची ५५ वी वार्षिक सभा खेळीमेळीत

**● नेवासा । वीरभूमी–**

**दुष्काळी परिस्थितीमुळे पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून, मोठ्या कष्टाने उभे केलेले ऊस पीक अडचणीत आले आहे. त्यामुळे यंदा गळीत हंगाम लवकर सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या प्रतिकूल परिस्थितीतही ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना उच्चांकी ऊस गाळप करेल, अशी ग्वाही कारखान्याचे अध्यक्ष तथा माजी आमदार नरेंद्र घुले पाटील यांनी दिली.**

नेवासा तालुक्यातील भेंडा येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याची ५५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी (दि. २७) कारखाना कार्यस्थळावर अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र घुले पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

यावेळी जिल्हा सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील, उपाध्यक्ष काकासाहेब नरवडे पाटील, आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, माजी आमदार पांडुरंग अभंग, ॲड. देसाई देशमुख, तज्ज्ञ संचालक डॉ. क्षितिज घुले पाटील, संचालक डॉ. नारायण म्हस्के, पंडितराव भोसले, अशोकराव मिसाळ, दत्तात्रय काळे, जनार्दन कदम, मच्छिंद्र म्हस्के, बबनराव भुसारी, ड. हिम्मतसिंह देशमुख, अमोल अभंग, विकास नन्नवरे, संतोष पावसे, जनार्दन शेळके, दादासाहेब कोकणे, प्रसाद पटारे, रामनाथ राजपुरे, गोरक्षनाथ भेंडेकर, बाळासाहेब खरड, सौ. सुमनबाई काळे, रवींद्र नवले, अंकुशराव काळे, कामगार संचालक सुखदेव फुलारी, कार्यकारी संचालक अनिल शेवाळे, जनरल मॅनेजर रवींद्र मोटे आदी उपस्थित होते.

सभेच्या प्रारंभी संत ज्ञानेश्वर माऊली व लोकनेते मारुतराव घुले पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर अहवाल सालातील दिवंगतांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

**शेतकऱ्यांना पाणी मिळालेच पाहिजे**

नरेंद्र घुले पाटील म्हणाले, सहकारी चळवळ चालविताना पक्षभेद बाजूला ठेवून काम करावे लागते. ज्ञानेश्वर सहकारी कारखान्याची निवडणूक बिनविरोध झाल्याबद्दल सर्व सभासद व लोकप्रतिनिधींचे आभार. मुळा व जायकवाडीच्या पाण्यावर शेतकऱ्यांचा पहिला हक्क आहे. त्यांना शेतीसाठी पाणी मिळालेच पाहिजे.

मुळा धरणाचे आवर्तन सुरू असताना टेल टू हेड पद्धतीने पाणी भरणे झाल्यास सर्वांना पाणी मिळते. पाणी जिरल्याने भूजलपातळीही वाढते, असे त्यांनी सांगितले. दुष्काळ कायमस्वरूपी दूर करण्यासाठी पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी तातडीने गोदावरी खोऱ्यात वळविण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

दुष्काळी परिस्थितीत नागरिक व जनावरांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे सरकारलाही शक्य होणार नाही. त्यामुळे बॅकवॉटरवरील पंपांचे वीजजोड तोडणे व्यवहार्य ठरणार नाही, असे सांगून सर्वांनी आपल्याच कामधेनूला ऊस द्यावा. गाळप चांगले झाले तर ऊसदरही अधिक देता येईल. आपल्या सर्वांच्या सहकार्याने यंदाचा गाळप हंगाम एक नंबरचा राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

ज्येष्ठ नेते ॲड. देसाई देशमुख म्हणाले, ज्ञानेश्वर कारखान्याने मार्गदर्शन व सहकार्य करून शेतकऱ्यांमध्ये ऊस उत्पादनाची क्षमता निर्माण केली. कार्यक्षेत्रात ऊस उत्पादन जास्त असूनही कारखान्याला कमी ऊसपुरवठा होणे योग्य नाही. कारखाना टिकविण्यासाठी सर्वांनी आपला ऊस ज्ञानेश्वरलाच दिला पाहिजे.

अंकुशराव काळे, दिनकरराव गर्जे, रामदास कोरडे व ताराचंद लोढे यांनीही मनोगत व्यक्त केले.

यावेळी ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. सतीश पाटील, माजी संचालक काशिनाथ नवले पाटील, शिवाजीराव कोलते, दादासाहेब गंडाळ, संजय कोळगे, जनार्दन पठारे, सुधाकर लांडे, सखाराम लव्हाळे, विष्णुपंत जगदाळे, शिवाजीराव भुसारी, निवृत्ती दातीर, रामभाऊ जगताप, राजेंद्र मते, माणिकराव थोरात, भास्कर खेडकर, अंबादास कळमकर, अनिल मडके, ॲड. विश्वास काळे, ॲड. शिवाजीराव दसपुते, शरद आरगडे, वैभव नवले, डॉ. सुदाम खाटीक, शेषराव साबळे, संतोष म्हस्के, ज्ञानदेव पाडळे, बबन भानगुडे, एकनाथ भुजबळ, बाबासाहेब आगळे, काकासाहेब घुले, संभाजी पवार, संभाजी आगळे, भाऊसाहेब आगळे, बबनराव धस, शेषराव दुकळे, हरिभाऊ दुकळे, मिलिंद कुलकर्णी, बजरंग मुंगसे, कारभारी चिडे, बन्सी मुंगसे, मोहनराव गायकवाड, अनिल घोरपडे, गणेश खंबरे, अशोक धस, अशोक वायकर, गणेश गव्हाणे, एकनाथ कसाळ, बाळासाहेब नवले, अजित मुरकुटे, प्रभाकर कोलते, बबनराव जगदाळे, पुरुषोत्तम सर्जे, संदीप खरड, राहुल बेडके, हुकूम नवले, नवनाथ साळुंके, रामकृष्ण कांगुणे, भानुदास कावरे, जनार्दन कदम, गोरक्षनाथ कापसे, अशोक मेरड, दत्तात्रय विधाटे, दत्तात्रय खाटीक, काकासाहेब लबडे, आप्पासाहेब देशमुख, आप्पासाहेब गर्जे, मधुकर वावरे, पंडित वाघ, जनार्दन हारदे, कचरू वाबळे, अरुण खंडागळे, सतीश चुत्तर, सोपान महापूर, विश्वनाथ मते आदी उपस्थित होते.

कार्यकारी संचालक अनिल शेवाळे यांनी सभा नोटिसीचे वाचन केले. जनरल मॅनेजर रवींद्र मोटे यांनी अहवाल सालातील दिवंगतांना श्रद्धांजली अर्पण करणारा ठराव मांडून मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचले. मुख्य लेखपाल रामनाथ गरड यांनी नफा–तोटा पत्रक व ताळेबंदाचे वाचन केले.

महाराष्ट्र शासनाचा विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल कामगार संचालक सुखदेव फुलारी यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

सभेचे सूत्रसंचालन भाऊसाहेब सावंत व कल्याणराव म्हस्के यांनी केले. संचालक अशोकराव मिसाळ यांनी आभार मानले.




### उसाला प्रतिटन ५०० रुपये अनुदान द्यावे : पांडुरंग अभंग

■ माजी आमदार पांडुरंग अभंग म्हणाले, चार वेळा उसाची एफआरपी वाढली; मात्र साखरेच्या एमएसपीमध्ये एकदाही वाढ झालेली नाही. यंदा अल्प पाऊस, एल निनोचे संकट आणि हुमणी अळीच्या प्रादुर्भावामुळे उसाचे एकरी टनेज तसेच साखर उतारा घटण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने उसाला प्रतिटन ५०० रुपये अनुदान द्यावे. कार्य क्षेत्रातील सर्व ऊस गाळपाला प्राधान्य देऊन गाळप केला जाईल. ऊस वजनकाटाही अचूक व पारदर्शक आहे. सर्वांनी आपला ऊस ज्ञानेश्वर कारखान्यालाच द्यावा. ऊसदरात कारखाना अव्वल राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

### पाण्याचे योग्य नियोजन करा : आ. विठ्ठलराव लंघे

■ आमदार विठ्ठलराव लंघे पाटील म्हणाले, लोकनेते मारुतराव घुले पाटील, स्वर्गीय वकीलराव लंघे अण्णा यांच्यासह ज्येष्ठ नेत्यांनी ज्ञानेश्वर कारखान्याच्या व्यवस्थापनात एकत्र काम केले. हा कारखाना सर्वांची कामधेनू आहे. राज्यासह तालुक्यात दुष्काळी परिस्थिती आहे. मुळा उजव्या कालव्याचे आवर्तन सुरू असून अद्याप ४० टक्के भरणे बाकी आहे. टेल टू हेड पद्धतीने पाणी सोडले जात आहे. या आवर्तनानंतर आणखी एक आवर्तन घेण्याचा प्रयत्न केला जाईल; मात्र त्याच्या भरवशावर पिके घेणे धोकादायक ठरेल. त्यामुळे सर्वांनी पाण्याचे योग्य नियोजन करावे. बॅकवॉटरवरील पंपांचे वीजजोड तोडले जाणार नाहीत, याची काळजी घेतली जाईल. दुष्काळामुळे उसाचे टनेज घटले असून यावर्षी चांगला भाव द्यावा लागेल. सभासदहिताचे निर्णय घेत कारखाना टिकविणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

### अडचणीच्या परिस्थितीत कारखान्याची उभारणी : उपाध्यक्ष काकासाहेब नरवडे

■ स्वागत व प्रास्ताविक करताना उपाध्यक्ष काकासाहेब नरवडे पाटील म्हणाले, अत्यंत अडचणीच्या परिस्थितीत लोकनेते मारुतराव घुले पाटील यांनी ज्ञानेश्वर कारखान्याची स्थापना केली. नरेंद्र घुले पाटील व चंद्रशेखर घुले पाटील यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याचे आधुनिकीकरण व विस्तारीकरण झाले असून कारखाना तांत्रिकदृष्ट्या सक्षम झाला आहे. यंदाचा गळीत हंगाम दुष्काळी परिस्थितीत घ्यावा लागणार असून सर्वांच्या सहकार्याने तो यशस्वी करू.

# बाबुजी आव्हाड महाविद्यालयात जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धा

## महिला–पुरुष संघांचे आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद

**● पाथर्डी । वीरभूमी–**

अहिल्यानगर जिल्हा आंतरमहाविद्यालयीन वेटलिफ्टिंग स्पर्धा, जिल्हा शालेय वेटलिफ्टिंग स्पर्धा तसेच अहिल्यानगर डिस्ट्रिक्ट वेटलिफ्टिंग असोसिएशनच्या मान्यतेने आयोजित युथ, ज्युनियर व सीनियर गटातील जिल्हा वेटलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धा बाबुजी आव्हाड महाविद्यालयात उत्साहात पार पडली.



स्पर्धेचे उद्घाटन पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे विश्वस्त कुणाल आव्हाड यांच्या हस्ते झाले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे, अहिल्यानगर जिल्हा क्रीडा विभागाचे सचिव डॉ. सतीश चोरमले, महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक तथा अहिल्यानगर जिल्हा वेटलिफ्टिंग असोसिएशनचे सचिव प्रा. डॉ. विजय देशमुख, उपाध्यक्ष राजेंद्र सोनवणे, प्रा. दादासाहेब लोखंडे, प्रा. डॉ. रोहित अदलिंग आदी उपस्थित होते.

स्पर्धेत जिल्ह्यातील विविध महाविद्यालये व शाळांमधील २०० हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला. विविध वयोगट व वजनगटांमध्ये खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरीचे प्रदर्शन केले. बाबुजी आव्हाड महाविद्यालयाच्या महिला व पुरुष संघांनी आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद पटकावले.

स्पर्धेतील पंच म्हणून राजेंद्र सोनवणे, प्रा. डॉ. विवेक साळवे, प्रवीण चोरमले, प्रशांत गायकवाड, शहानवाज आतार, कार्तिक तेवर, राहुल घुमरे व संजय लोखंडे यांनी जबाबदारी पार पाडली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. विजय देशमुख यांनी केले, तर आभार प्रा. सचिन शिरसाट यांनी मानले.

# १६ वे अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन शेतीच्या बांधावर

## प्रा. ज्ञानेश वाकुडकर संमेलनाध्यक्ष । हिंगणघाट तालुक्यात २५ ते २७ डिसेंबरदरम्यान आयोजन

**● शिर्डी । वीरभूमी–**

शेतीच्या प्रत्यक्ष वास्तवाशी साहित्याची नाळ जोडण्यासह शेती, शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या प्रश्नांवर साहित्यिकांमध्ये जाणीव निर्माण करण्यासाठी १६ वे अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन २५ ते २७ डिसेंबर २०२६ दरम्यान ॲग्रीसन एफपीसी परिसर, आर्वी छोटी शिवार, ता. हिंगणघाट, जि. वर्धा येथे आयोजित करण्यात आले आहे. विदर्भातील ज्येष्ठ शेती साहित्यिक व लोकप्रिय कवी प्रा. ज्ञानेश वाकुडकर यांची संमेलनाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. अशी माहिती अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य चळवळीचे संस्थापक अध्यक्ष गंगाधर मुटे यांनी दिली.

युगात्मा शरद जोशी यांच्या शेतीकेंद्रीय अर्थशास्त्राचा आणि वैचारिक वारशाचा साहित्याच्या माध्यमातून प्रसार व्हावा, तसेच शेतीच्या प्रश्नांचे वास्तव साहित्यिकांनी अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडावे, या उद्देशाने शेती अर्थ प्रबोधिनीच्या माध्यमातून वर्षभर विविध उपक्रम राबविले जातात. त्याच उपक्रमांचा भाग म्हणून हे संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

प्रत्यक्ष शेती–मातीचा अनुभव साहित्यिकांना मिळावा, या उद्देशाने यंदाचे संमेलन शेतीच्या बांधावर आयोजित करण्यात आले आहे. साहित्यिकांना शेती अर्थशास्त्र, नवतंत्रज्ञान आणि ग्रामीण वास्तवाची जाण करून देतानाच नवसाहित्यिकांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा संमेलनाचा उद्देश आहे.

उद्घाटन सोहळ्यात महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य ज्येष्ठ पत्रकार श्रीपाद अपराजित प्रमुख अतिथी, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. प्रमोद मुनघाटे प्रमुख पाहुणे, तर माजी आमदार सरोजताई काशीकर व ॲड. वामनराव चटप विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. डॉ. अनिलकुमार जवादे स्वागताध्यक्ष, तर गंगाधर मुटे कार्याध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळणार आहेत.

३ दिवस चालणाऱ्या संमेलनाच्या आयोजनाकरिता विविध समित्यांचे गठन करण्यात आले असून दिलीप भोयर (अमरावती), ॲड सतीश बोरुळकर (मुंबई), उपेंद्र महात्मे (कळमेश्वर), जयंत बापट (यवतमाळ), रमेश खांडेभराड (जालना), सुनील बावणे (चंद्रपूर), राजेंद्र फंड (अहिल्यानगर), प्रवीण आडेकर (भद्रावती), डॉ. मनीषा रिठे, मधुसूदन हरणे, प्रतिभा काळे, दिलीप देवतळे, गणेश मुटे, प्रकाश गोटे, सारंग दरणे, भारत पाटील, राजेंद्र पाटील, सुरेश सातोकर, नरेंद्र गंधारे, सुरेश सुरजुसे, रंगनाथ तालवटकर, नीलकंठ घवघवे, अरविंद बोरकर, रविंद्र खोडे, मुकुंद खोडे, गजानन जिकार, दत्ता राऊत, ज्ञानेश्वर चौधरी, मधुसूदन धारकर, विद्यानंद हाडके, गिरधर काचोळे, नारायण निखाते, प्रशांत झिलपे, सचिन कांबळे, प्रवीण पोहाणे, मुकेश धाडवे, विनोद काळे, निखिल खातबागे, शिवम मुटे, सतीश मानकर, जया कोपरकर, विवेक मुटे यांचा विविध समित्यामध्ये समावेश आहे.

तीन दिवसांच्या संमेलनात 'शेती, शेतकरी आणि प्रसारमाध्यमे', 'शेतीत थांबावे की बाहेर पडावे?', 'शेतीसाहित्य आणि मानसिक गुलामगिरी', 'मुख्य प्रवाहातील साहित्यात कृषीजन साहित्याचे अस्तित्व' आणि 'अक्षरांना एआय पंख : तंत्रज्ञानाच्या सानिध्यात वाङ्मयीन वाटचाल' या विषयांवर परिसंवाद होणार आहेत. याशिवाय शेतकरी कवी संमेलन, गझल मुशायरा, कथाकथन, संवाद व प्रकट मुलाखतींचे आयोजन करण्यात आले आहे.

शेतकरी आत्महत्या, दुष्काळ, नापिकी, उत्पादन खर्चातील वाढ, शेतमालाचे बाजारभाव आणि बदलते कृषी अर्थशास्त्र या प्रश्नांचे प्रतिबिंब मराठी साहित्यात अधिक प्रभावीपणे उमटावे, यासाठी शेतकरी साहित्य चळवळ कार्यरत आहे. २०१५ पासून वर्धा, नागपूर, गडचिरोली, मुंबई, पैठण, अलिबाग, रावेरी, मोहाडी, जयसिंगपूर व महाबळेश्वर आदी ठिकाणी १५ संमेलने झाली आहेत.

यंदाचे संमेलन केवळ साहित्यिकांच्या कलागुणांचे प्रदर्शन न राहता शेतीच्या वास्तवाचा अभ्यास, चिंतन आणि सृजनशील मांडणीसाठी बौद्धिक व्यासपीठ ठरावे, असा आयोजकांचा प्रयत्न आहे. संमेलनात ज्येष्ठ साहित्यिक, शेतकरी नेते, शेती अर्थशास्त्राचे अभ्यासक, अर्थतज्ज्ञ आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर सहभागी होणार आहेत. शेतीप्रेमी साहित्यिक व रसिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# भिंगारला २ एफएसआयची मंजुरी; लोकसभेतील डॉ. सुजय विखे पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

## भिंगारवासीयांच्या वर्षानुवर्षांच्या मागणीला मिळाली दिशा । बांधकामाच्या मर्यादा दूर होण्याचा मार्ग मोकळा

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

भिंगार कँटोन्मेंट परिसरातील नागरिकांच्या वर्षानुवर्षांच्या प्रलंबित प्रश्नाला आता महत्त्वपूर्ण दिलासा मिळाला आहे. भिंगार कँटोन्मेंट बोर्डाच्या कार्यक्षेत्रात २ एफएसआयला मंजुरी देण्यात आली असून, संरक्षण मंत्रालयाने यासंदर्भातील सुधारित राजपत्र अधिसूचना जारी केली आहे. या निर्णयामुळे भिंगारमधील बांधकामाच्या मर्यादा मोठ्या प्रमाणात शिथिल होण्याचा मार्ग मोकळा झाला असून, हजारो मालमत्ताधारकांना त्याचा लाभ होणार आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला या निर्णयामुळे यश मिळाले आहे. त्यामुळे भिंगारमधील बांधकामाच्या मर्यादा शिथिल होण्याचा मार्ग मोकळा झाला असून, हजारो मालमत्ताधारकांना दिलासा मिळाला आहे.

भिंगारमधील नागरिकांना एफएसआय, बांधकामासाठी आवश्यक परवानग्या आणि इतर विविध अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा मुद्दा तत्कालीन खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी ७ डिसेंबर २०२३ रोजी लोकसभेत उपस्थित केला होता. भिंगार कँटोन्मेंटमध्ये सुमारे २५ हजार नागरी लोकसंख्या राहत असून, कँटोन्मेंटच्या नियमांमुळे नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांकडे त्यांनी सभागृहाचे लक्ष वेधले होते.

विशेषतः एफएसआयची मर्यादा, बांधकामासाठी एनओसी, पाणीपुरवठा तसेच केंद्र सरकारच्या योजनांच्या अंमलबजावणीतील अडचणी यांचा त्यांनी लोकसभेत उल्लेख केला होता. भिंगार कँटोन्मेंटमधील नागरी लोकसंख्येच्या समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची गरज व्यक्त करताना, कँटोन्मेंट क्षेत्र अहिल्यानगर महानगरपालिकेत समाविष्ट करण्याची प्रक्रियाही तातडीने पूर्ण करण्याची मागणी त्यांनी संरक्षण मंत्रालयाकडे केली होती.



लोकसभेत हा प्रश्न उपस्थित केल्यानंतरही डॉ. सुजय विखे पाटील यांनी भिंगारच्या प्रश्नांकडे सातत्याने लक्ष दिले. एफएसआयचा प्रश्न हा केवळ बांधकामाचा विषय नसून, भिंगारमधील हजारो कुटुंबांच्या दैनंदिन जीवनाशी आणि भविष्यातील गरजांशी संबंधित असल्याची भूमिका त्यांनी मांडली होती. त्यामुळे आता संरक्षण मंत्रालयाकडून २ एफएसआयला मिळालेली मंजुरी हा भिंगारच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

आतापर्यंत केवळ १ एफएसआय लागू असल्याने उपलब्ध जागेवर गरजेनुसार बांधकाम करण्यावर मर्यादा होत्या. वाढती कुटुंबे, बदलत्या गरजा आणि बांधकामाच्या मर्यादा यामुळे अनेक मालमत्ताधारक अडचणीत होते. आता एफएसआय दुप्पट झाल्यामुळे नियमानुसार अधिक बांधकाम करण्याचा मार्ग मोकळा होणार असून, भिंगार परिसराच्या नागरी विकासालाही चालना मिळण्याची शक्यता आहे.

या निर्णयासाठी भिंगार कँटोन्मेंट परिसरातील नागरिक, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि संबंधित प्रशासनाकडूनही सातत्याने पाठपुरावा करण्यात आला होता. कँटोन्मेंट बोर्डाचे तत्कालीन मुख्याधिकारी मोरे आणि नामनिर्देशित सदस्य वसंत राठोड यांनी बिल्डिंग बायलॉजमध्ये बदल करण्याचा ठराव करून एफएसआय वाढविण्याची मागणी केंद्र सरकारकडे केली होती. या मागणीच्या पाठपुराव्यालाही आता यश आले आहे.

या महत्त्वपूर्ण निर्णयासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार संग्राम जगताप यांच्यासह कँटोन्मेंट बोर्डाचे अध्यक्ष ब्रिगेडियर पी. सुनीलकुमार, मुख्याधिकारी प्रिया पुरोहित, अभियंता अशोक फुलसुंदर आणि प्रवीण बागल यांचे सहकार्य लाभल्याबद्दल आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

भिंगारवासीयांच्या दीर्घकाळ प्रलंबित प्रश्नाला आता धोरणात्मक निर्णयामुळे दिशा मिळाली असून, तत्कालिन खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी लोकसभेपासून स्थानिक पातळीपर्यंत सातत्याने मांडला गेलेला एफएसआयचा प्रश्न अखेर निर्णयाच्या टप्प्यावर पोहोचला आहे. त्यामुळे भिंगारच्या नियोजित नागरी विकासाला आणि मालमत्ताधारकांच्या बांधकामाच्या गरजांना आता अधिक व्यापक अवकाश मिळणार आहे.